# पंचायत समिती, वसई

# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव** | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग |
| **खाते प्रमुखाचे पदनाम** | |
| **विभागाचा दुरध्वनी क्रमांक** | |
| **विभागाचा ईमेल** | |

## पंचायत समिती, वसई

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम मागणी आधारित धोरण असुन केंद्र शासन पुरस्कृत वर्धीत वेग कार्यक्रम, स्वजलधारा व राज्य शासन पुरस्कृत महाजल तसेच बिगर आदिवासी / आदिवासी अंतर्गत कामाचा समावेश करुन सन 2009-2010 पासुन सदर कार्यक्रमांचे रुपांतर **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम** असे केले आहे.
पाणी पुरवठा योजनेंतर्गत खालील पाणी पुरवठ्याच्या योजना हाती घेता येतील.

•साधी विहीर
•अस्तीत्वातील विहीरींचे रुंदीकरण व खोलीकरण
•विंधन विहीर (हातपंप)
•लघु नळ पाणी पुरवठा योजना
•शिवकालीन पाणी साठवण योजना
•अस्तीत्वातील योजनेची दुरुस्ती
•अस्तीत्वातील योजनेतील उद्भवाचे बळकटीकरण
•योजना विस्तारीकरण
•पुरक योजना
•नविन योजना
वरिलपैकी कोणतीही योजना आपल्या गावासाठी राबवावयाची झाल्यास आपल्या तालुक्यातील उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेशी संपर्क साधावा.
पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी, त्याचे नियोजन व कार्यवाही तसेच विहित कालावधी खालीलप्रमाणे आहे.

**•ठळकवैशिष्ट्ये-**
**धोरणातील महत्वाची तत्वे व प्राधान्यक्रम-**

•गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याचे उपाययोजनांचा आढावा घेवून त्यातील स्त्रोतांचे संवर्धन व बळकटीकरण करणे, अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये सुधारणे करणे.
•गुणवत्ताबाधीत गावांमध्ये सुरक्षित स्त्रोत विकसीत करण्याकरिता उपाययोजना करणे.
•गावाच्या लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे पुरक योजनांचा विचार करणे.
•उपाययोजना प्रस्तावित करतांना किमान खर्चावर आधारीत विकल्पाचा विचार करणे.
•एकच योजना करण्यापेक्षा विकेंद्रीत उपाययोजना किफायतशीर असल्यास त्यास प्राधान्य देणे.
•100% घरगुती नळ जोडणेचा समावेश अनिवार्य करणे.
•गाव कृती आराखडा तयार करणे.
•काम सुरु करण्यापूर्वी गांव किमान 60 % हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे.
•मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.